# निशाणी क्र. ४९ खालील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. 1 यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचे विरूद्ध झालेला ''विना कैफियत चौकशी '' आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादी क्र. 1 च्या कथनानुसार, सदर दाव्यात आवश्यक ते जुने कागदपत्र वादीकडून या प्रतिवादी यांना उपलब्ध झालेले नव्हते त्यामुळे कागदपत्र काढण्यास उशीर झालेला आहे. तसेच प्रतिवादीचे नातेवाईक आजारी असल्याने या प्रतिवादींना मे. न्यायालयात हजर राहता आलेले नसून, कोविड-१९ मुळे देखील उशीर झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादीविरूध्द म्हणणे नाहीचा आदेश झालेला आहे. पुढे अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार प्रतिवादींनी मुद्दामहून अथवा हेतुपुरस्पर विलंब केलेला नसून प्रतिवादी यांना कैफियत देवून बचाव मांडण्याची संधी देणे गरजेचे असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल केले असून वादीचे म्हणन्यानुसार, सदर दाव्यात प्रतिवादी क्र. 1 यांना दिनांक १५/१०/२०१९ रोजी नोटीस मिळालेले असून, ते दाव्यामध्ये हजर झालेले आहेत. सदर प्रतिवादींनी मुदतीमध्ये कैफियत दिलेली नसून, त्याच्याविरूध्द दिनांक १५/०१/२०२० रोजी विना कैफियत चौकशी असा आदेश पारित झालेला आहे. तदनंतर सुमारे एका वर्षानंतर अर्ज दिला असून, मर्जीनुरूप आदेश व्हावा असे नमूद केलेले आहे.

**४.** प्रतिवादीचा अर्ज व त्यावरील वादीने दिलेले म्हणणे वाचले. वादी-प्रतिवादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा प्रतिवादी विरूद्ध वादमिळकतीची मोजणी होवुन हदद निशाण्या कायम करून मिळण्याकरिता व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. 1 यांना नोटीसीची बजावणी होवुनही मुदतीत म्हणणे न दिल्याने दि. १५/०१/२०२० रोजी विना कैफियत चौकशी आदेश पारित झालेला आहे. त्यानंतर योग्य त्या कायदेशीर मुदती नंतर एका वर्षाच्या विलंबानंतर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत

नाही. परंतु, प्रतिवादी क्र. १ ची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करणेस मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादीं क्र. १ चा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. १ यांना आपले म्हणने कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## -: आदेश :-

**१.** प्रतिवादी क्र. १ चा प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ विरूद्ध ''विना कैफियत चौकशी '' असा आदेश रक्कम रू. ५००/- चा दंड वादींना देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो. प्रतिवादी यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्या नंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

सही/-
पी. व्ही. सपकाळ
दिवाणी न्यायाधीश, जामखेड.

दिनांक : ०८/०३/२०२१.